# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १२१ दिनांक- ०८/०५/२०२१

**भाईंदर पो.ठाणे कार्यक्षेत्रात मानवी आरोग्यास अपायकारक असलेला गुटखा, पान मसाला व सुंगधीत तंबाखु विक्रीकरीता साठवणुक केलेल्या मालावर श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १ यांची कारवाई..**

***************

दिनांक ०७.०५.२०२१ रोजी एका दुकानात मानवी आरोग्यास अपायकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधी तंबाखु,विक्रीकरीता साठवणुक केली असल्याची बातमी, गुप्त बातमीदाराकडून श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मिरारोड यांना मिळाली.

त्यानुसार पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने दि.०७/०५/२०२१ रोजी शॉप नंबर एस-२, गंगा जमुना बिल्डींग, विनायक मंदीर रोड, मोदी पटेल रोड, भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे येथे छापा घातला असता शॉपमध्ये रामनवल रामदेव गुप्ता, वय ४८ वर्षे, रा. फ्लॅट नंबर बी/१३, बिंदू बिल्डींग, ६० फुट रोड, भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे हा मिळून आला. तसेच सदर शॉपमध्ये त्याच्या ताब्यात असलेला K.K.1000, Rokada गुटखा व बंदर च्युईंगम सुगंधीत तंबाखु व रोख रक्कम असा एकुण १,८३,१३० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

सदर प्रकरणी वरील इसमाविरुध्द भाईंदर पो.ठाणे गुरनं. । २०८/२०२१ कलम ३२८, २७२, २७३ भादंवि. सह कलम २६(२),(४), ३०(२)(ए), ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ प्रमाणे दिनांक ०८.०५.२०२१ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कारवाई श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांच्या मार्गदर्शनाखाली, दत्तुसाहेब लोंढे, सहा.पोलीस निरीक्षक, पोहवा.अजय मांडोळे, पोकॉ.जितेंद्र उथळे व पोकॉ.विनोद चव्हाण यांनी केली आहे.

Scanned with CamScanner